# NMC e NEWS LETTER

मार्च २०१८

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/



## समिती बैठक वृत्त

### जलप्रदाय समिती

नागपूर: टिल्लू पंप लावणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा जलप्रदाय समिती सभापती विजय (पिंटू) झलके यांनी दिला. २६ मार्च रोजी आयोजित जलप्रदाय समितीच्या बैठकीप्रसंगी ते बोलत होते.बैठकीला समिती उपसभापती श्रद्धा पाठक, समिती सदस्य प्रदीप पोहाणे, हरीश ग्वालबंशी, जयश्री रारोकर, प्रणिता शहाणे, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) संजय गायकवाड प्रामुख्याने उपस्थित होते. ज्या ठिकाणी दूषित पाण्याची तक्रार येत असेल त्याठिकाणी तात्काळ स्थानिक नगरसेवकांची मदत घेऊन प्रशासनाने दौरा करावा असे निर्देश त्यांनी दिले.

### अग्निशमन व विद्युत समिती

नागपूर: अग्निशमन विभागाद्वारे देण्यात येणारी बांधकाम मंजुरी शासकीय नियमानुसारच देण्यात येणार असल्याची माहिती नवनिर्वाचित अग्निशमन आणि विद्युत समिती सभापती लहुकुमार बेहते यांनी दिली. २८ मार्च रोजी आयोजित समितीच्या आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते.यावेळी उपसभापती वर्षा ठाकरे, समिती सदस्य निशांत गांधी, अनिल गेंडरे, सदस्या वनिता दांडेकर, आशा नेहरू उईके, ममता सहारे, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, उप अग्निशमन अधिकारी बी.पी. चंदनखेडे, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना लहुकुमार बेहते म्हणाले, अग्निशमन विभागाद्वारे बांधकामांना मंजुरी देण्यात येतात, त्या मंजुरीचे दर वाढविण्यासाठी प्रशासना द्वारे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यावर बोलताना, शासकीय नियमानुसारच मंजुरी आणि मंजुरीचे दर वाढविण्यात यावे, असे निर्देश सभापती लहुकुमार बेहते यांनी दिले.

### परिवहन समिती

नागपूर: नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाद्वारे संचालित होणाऱ्या 'आपली बस'चा तोटा वाढतच आहे. हा तोटा कमी व्हावा यासाठी विविध उपाययोजनांवर परिवहन समितीच्या सभेत चर्चा करण्यात आली. समिती या विषयासंदर्भात गंभीर असल्याचे सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी सांगितले. सभेला उपसभापती प्रवीण भिसीकर, सदस्य नितीश ग्वालबंशी, नितीन साठवणे, मनिषा धावडे, अर्चना पाठक, उज्वला शर्मा, वैशाली रोहणकर, अभिरुची राजगिरे, कल्पना कुंभलकर, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे, अरुण पिपुरडे आदी उपस्थित होते. परिवहन विभागाचा तोटा कमी करण्यासाठी समितीतर्फे विशेष प्रयत्न सुरू असल्याचे परिवहन सभापती बंटी कुकडे यांनी सांगितले. बैठकीत धोरणात्मक निर्णया संदर्भातील विषय महासभेकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.

### स्थापत्य व प्रकल्प समिती

नागपूर: सन २००० मध्ये नागपूर शहरासाठी मंजूर झालेल्या विकास आराखड्यानुसार असलेल्या आरक्षणाची सद्यस्थिती काय, वाहनतळांची जी आरक्षणे आहेत त्याची वास्तव स्थिती काय आहे, याबाबत सविस्तर अहवाल स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीला एका आठवड्यात सादर करण्याचे निर्देश स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीचे सभापती संजय बंगाले यांनी दिले.

विकास आराखड्यातील आरक्षणासंदर्भात मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला समितीचे उपसभापती किशोर वानखेडे, सदस्य भगवान मेंढे, राजकुमार शाहू, जितेंद्र घोडेस्वार, अतिरिक्त उपायुक्त राजेश मोहिते, शहर अभियंता मनोज तालेवार, विकास अभियंता सतीश नेरळ, नगररचनाकार प्रवीण सोनारे उपस्थित होते.

नगररचनाकार प्रवीण सोनारे यांनी आरक्षणासंदर्भात समितीला माहिती दिली. मोरभवनमागील रस्त्याचे कार्य १ एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश सभापती श्री. बंगाले यांनी दिले.

## जॉगींग, वाकिंग, सायकल ट्रॅकचे कस्तुरचंद पार्कवर भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस, ना. गडकरींनी केले वृक्षारोपण



नागपूर: राज्य शासनाच्या निधीअंतर्गत महानगरपालिकेद्वारे शहराचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या कस्तुरचंद पार्कवर साकारण्यात येणाऱ्या जॉगींग, वॉकिंग आणि सायकल ट्रॅकचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली आणि ऊर्जामंत्री तसेच नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी महापौर नंदा जिचकार, आमदार सुधाकर देशमुख, मनपा स्थायी समितीचे सभापती विरेंद्र कुकरेजा, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, जिल्हाधिकारी सचिन कुर्वे, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष डॉ. दीपक म्हैसेकर, मंगळवारी झोन सभापती सुषमा चौधरी, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, स्थापत्य समितीचे सभापती संजय बंगाले, विधी समितीचे सभापती ड. धर्मपाल मेश्राम, कर आकारणी समितीचे सभापती संदीप जाधव, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेवक सुनील हिरणवार, किशोर जिचकार, नगरसेविका स्नेहा निकोसे, ममता सहारे, सहायक आयुक्त प्रकाश वराडे, शहर अभियंता मनोज तालेवार, सोलर इंडस्ट्रीज इंडिया लि.चे व्यवस्थापकीय संचालक मनीष नुवाल, उपाध्यक्ष जे. एफ. सालवे उपस्थित होते. कस्तुरचंद पार्कच्या सौंदर्यीकरणा अंतर्गत तेथे नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक, जॉगींग ट्रॅक, सायकल ट्रॅक साकारण्यात येत आहे. सभोवताल वृक्षलागवड करण्यात येणार आहे. तर पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल, असा सेल्फी प्वॉईंट तयार करण्यात येत आहे. सेल्फी प्वॉईंट पूर्णत: सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड कंपनी साकारणार असून अन्य सौंदर्यीकरणाचा प्रकल्प ११ कोटींचा आहे. राज्य शासनाने पाच कोटींचा निधी मंजूर केला आहे. या सौंदर्यीकरणासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विविध आर्किटेक्ट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पना सादर केल्या होत्या. त्यात 'आयडियाज' आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली संकल्पना निवडण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य अभय पुरोहित आणि प्रा. केतन किंमतकर यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी डिझाईन सादर केले होते.



## निलय मुरारका मार्ग देशातील आदर्श मार्ग ठरेल – बनवारीलाल पुरोहित

नागपूर : निलय मुरारका मार्ग हा देशातील आदर्श मार्ग ठरेल, स्वच्छतेच्या दृष्टीने त्या मार्गाची चर्चा साऱ्या देशभरात होईल, असा विश्वास तामिळनाडू राज्याचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांनी केला. २५ मार्च रोजी रामनवमीच्या पावन पर्वावर एस.टी.स्टँड ते मॉडेल मिल मार्गाचे निलय मुरारका मार्गनामकरण सोहळा आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उर्जामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष महापौर नंदा जिचकार, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, धंतोली झोन सभापती प्रमोद चिखले, स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले, नगरसेविका लता काडगाये, नगरसेवक सुनील हिरणवार, नगरसेवक विजय चुटेले, झोन सहायक आयुक्त स्मिता काळे, मुरारका परिवारातील लक्ष्मीकांत मुरारका, शीतल मुरारका प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना बनवारीलाल पुरोहित म्हणाले, शहरातील एका रस्त्याला निलय यांचे नाव द्यावे, अशी मुरारका परिवाराची इच्छा होती. त्यासाठी स्थानिक नगरसेवक, महापौर आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी पाठपुरावा करून हे काम पूर्णत्वास नेले. कोणताही निर्णय महापालिकेने घेताना त्याचे सभागृहात एकमत असणे गरजेचे असते, ते स्थानिक नगरसेवकांनी व महापौरांनी घडवून आणले, याकरिता त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत धंतोली झोन सभापती प्रमोद चिखले आणि सहायक आयुक्त स्मिता काळे यांनी केले. मुरारका परिवारातर्फे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकाद्वारे झोन सभापती प्रमोद चिखले यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी विषद केली. कार्यक्रमाचे संचालन मधू पराड यांनी केले. महापौर नंदा जिचकार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, प्रमोद अग्रवाल, राकेश अग्रवाल, संजय राठी, मनीष मेहाडिया, मनीष ओझा, गणेश गुप्ता, अनिल अग्रवाल, रवी मेहाडियाल प्रामुख्याने उपस्थित होते.

## कामगार कॉलनी, तुकडोजी नगर परिसरातील झोपडपट्टीधारकांना पट्टेवाटप

नागपूर: झोपडपट्टीधारकांचे ले–आऊट नियमित करून त्यांना स्थायी स्वरूपाचे पट्टे वाटपासंदर्भात प्रक्रिया सुरू झाली असून ३१ मार्च रोजी महापौर नंदा जिचकार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात प्रभाग ३७ अंतर्गत येणाऱ्या कामगार कॉलनी आणि तुकडोजी नगर परिसरातील झोपडपट्टीधारकांना पट्टे वाटप केले.यावेळी मनपातील सत्तापक्ष नेते संदीप जोशी, जिल्हाधिकारी सचिन कुर्वे, प्रभाग ३७ चे नगरसेवक प्रा. दिलीप दिवे, प्रमोद तभाने, नगरसेविका सोनाली कडू, कार्यकर्ते केशव ठाकरे, सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या लिना बुधे उपस्थित होते. यावेळी एकूण ४५ पट्टे तयार होते. त्यापैकी प्रातिनिधिक स्वरूपात पाच नागरिकांना पट्ट्यांचे वाटप करण्यात आले. ज्यांना पट्टेट वाटप करण्यात आले त्यांच्यामध्ये अरुण विश्वनाथ रामटेके, राजेंद्र हरिभाऊ गजभिये, गुलाब रामाजी जामधे, कांता माणिकराव रोहणे, दशरथ हरिभाऊ गजभिये यांचा समावेश आहे.



## नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती विरेंद्र कुकरेजा यांचा सत्कार



नागपूर : स्थायी समितीच्या सभापतीपदी विरेंद्र कुकरेजा यांची निवड झाल्यानंतर पदग्रहण समारंभाच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी बोलताना सभापती विरेंद्र कुकरेजा म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी दिलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा आपण प्रयत्न करू. आपण संघटनेत कार्य करून इथपर्यंत पोहोचलो आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात सर्व नेत्यांच्या सहकार्याने संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन स्थायी समितीचे सभापती म्हणून कार्य करू, या शब्दात मनपा स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती विरेंद्र उर्फ विक्की कुकरेजा यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. मंचावर भाजपचे शहर अध्यक्ष तथा दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे, आमदार डॉ. मिलिंद माने, पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे, आमदार गिरीश व्यास, आमदार डॉ. परिणय फुके, उपमहापौर दीपराज पार्डीकर, मावळते स्थायी समिती सभापती संदीप जाधव, सत्ता पक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, बसपाचे पक्षनेते मोहम्मद जमाल, नगरसेवक तथा विश्वस्त भूषण शिंगणे, श्रीमती राखी कुकरेजा, साई गोविंदराव आश्रमाचे भाई पहेलाराम उपस्थित होते. प्रारंभी महापौर नंदा जिचकार आणि भाजपचे शहर अध्यक्ष तथा आमदार सुधाकर कोहळे यांनी नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती विरेंद्र उर्फ विक्की कुकरेजा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रास्ताविकातून मावळते सभापती संदीप जाधव यांनी वर्षभरातील त्यांच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकला. संचालन नगरसेविका तसेच भाजपच्या मनपातील प्रतोद दिव्या धुरडे यांनी केले. आभार नगरसेवक सुनील हिरणवार यांनी मानले. यावेळी मंचावर स्थायी समितीचे आजी–माजी सदस्य सुनील हिरणवार, शेषराव गोतमारे, महेश महाजन, हर्षला साबळे, लता काडगाये, सरला नायक, नेहा वाघमारे, जयश्री वाडीभस्मे, मंगला खेकरे, सोनाली कडू, संगीता गिऱ्हे, सुभाष पारधी, मनीषा अतकरे उपस्थित होते.

# थोडक्यात...



## प्रवीण दटके समिती

नागपूर: नागपूर महानगरपालिकेच्या वतीने स्थानिक कस्तुरचंद पार्क येथे सर्वात उंच राष्ट्रध्वज उभारण्याच्या प्रक्रियेने वेग धरला आहे. माजी महापौर प्रवीण दटके समितीने यासंदर्भात बैठक घेऊन प्रक्रियेच्या प्रगतीची माहिती घेतली. येत्या १५ ऑगस्ट रोजी महापौरांच्या हस्ते हा ध्वज फडकावा, यादृष्टीने प्रयत्न केले जात असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.बैठकीला समितीचे अध्यक्ष माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, समितीचे सदस्य विजय (पिंटू) झलके, नगरसेवक दीपक चौधरी, एनईएसएलचे संचालक डॉ. रिजवान सिद्दिकी, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर उपस्थित होते. सदर बैठकीत राष्ट्रध्वज उभारण्याच्या कार्यात काय अडथळे आहेत, त्याबाबत चर्चा करण्यात आली. २३ मार्च रोजी हेरिटेज समितीच्या बैठकीत सदर विषय असून ज्या काही अडचणी असतील, त्या दूर करण्यात येईल, अशी माहिती समितीचे अध्यक्ष प्रवीण दटके यांनी दिली.

## मनपा द्वारे 'रमाई दौड' चे आयोजन

नागपूर: नागपूर महानगरपालिकेद्वारे यंदा रमाई दौडचे आयोजन रेशीमबाग मैदानावर करण्यात येणार असल्याची माहिती मनपाचे क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांनी दिली. २७ मार्च रोजी मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित समितीच्या पहिल्या आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते.
बैठकीला उपसभापती प्रमोद तभाने, समिती सदस्य संजय चावरे, समिती सदस्या दर्शनी धवड, विरंका भिवगडे, साक्षी राऊत, उपायुक्त रवींद्र देवतळे, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, क्रीडाधिकारी नितीन भोळे, क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी, जितेंद्र गायकवाड प्रामुख्याने उपस्थित होते. मागील वर्षी क्रीडा समितीद्वारे घेण्यात आलेल्या स्पर्धेविषयी माहिती क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी यांनी दिली. यावेळी सभापती नागेश सहारे यांनी विवेकानंद नगर येथील बॅडमिंटन हॉलबाबत आढावा घेतला. त्या हॉलमध्ये खेळाडूंना विशेषत्वाने प्राधान्य देणे, त्या ठिकाणी प्रशिक्षक नेमणे गरजेचे आहे, तो लवकरात लवकर नेमावा, असे आदेश सभापती नागेश सहारे यांनी दिले. नंदनवन येथील स्केटिंग रिंक मध्ये उन्हाळी शिबिर लावण्यात यावे व त्याठिकाणी मनपाच्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश सभापती नागेश सहारे यांनी दिले. यावर्षी सास्कृंतिक स्पर्धेकडे विशेष लक्ष देण्यात येत असल्याची माहिती सभापती नागेश सहारे यांनी दिली. प्रारंभी नव्याने नियुक्त झालेल्या क्रीडा समिती सदस्यांचे स्वागत

## डिजीटल प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन



नागपूर: नागपूर महानगरपालिकेअंतर्गत असलेल्या शाळांतील शिक्षकांना डिजीटल प्रशिक्षण देण्यासाठी राहतेकरवाडी येथील साने गुरुजी उर्दू माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात चवथ्या टप्प्यातील डिजीटल प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन २६ मार्च रोजी नगरसेविका नेहा वाघमारे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी डिजीटल प्रशिक्षणाचे समन्वयक मन्साराम डहाके, विषयतज्ज्ञ मिलिंद खेकाळे उपस्थित होते. मनपाच्या ३४ शाळा आतापर्यंत डिजीटल झाल्या आहेत. मागील वर्षी १८ शाळा डिजीटल करण्यात आला.या डिजीटल शाळांमध्ये विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळावे यासाठी माध्यमिक शाळांतील १६० शिक्षकांना सहा टप्प्यात प्रशिक्षित करण्याचा उपक्रम मनपाने हाती घेतला आहे. आतापर्यंत प्रशिक्षणाचे तीन टप्पे आटोपले असून चौथ्या टप्प्यात २६ मार्च ते ३ एप्रिलपर्यंत प्रशिक्षण देण्यात येणार असून यात २८ शिक्षक-शिक्षिका सहभागी झाल्या असल्याची माहिती समन्वयक मन्साराम डहाके यांनी दिली.

# 'अर्थ अवर' अंतर्गत नागपूरकरांनी केले 'लाईट्स ऑफ'

## मनपा-ग्रीन विजीलचा पुढाकार : जनजागृतीतून दिला सामाजिक संदेश



नागपूर : ऊर्जा बचतीचा संदेश देण्यासाठी नागपूर महानगर पालिका आणि ग्रीन विजील फाउंडेशनच्या पुढाकारातून 'अर्थ अवर-कनेक्ट टू अर्थ' पाळण्यात आला. मनपाने केलेल्या आवाहनाला दाद देत नागपूरकरांनी २४ मार्च रोजी रात्री ८.३० ते ९.३० या एक तासाच्या काळात अनावश्यक 'लाईट्स ऑफ' करून उर्जाबचतीचा संदेश दिला.'अर्थ अवर' निमित्त सीताबर्डी येथील इटर्निटी मॉल येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी महापौर आमदार प्रा. अनिल सोले, महापौर नंदा जिचकार, धरमपेठ झोन सभापती रूपा राय, माजी महापौर प्रवीण दटके, स्थापत्य समिती सभापती संजय बंगाले, मनपातील उपनेत्या वर्षा ठाकरे, नगरसेवक सुनील हिरणवार, अतिरिक्त उपायुक्त जयंत दांडेगावकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जैस्वाल, ग्रीन विजील फाउंडेशनचे संस्थापक कौस्तभ चैटर्जी, इटर्निटी मॉलचे महाव्यवस्थापक आशीष बारई उपस्थित होते. यावेळी ग्रीन विजीलचे स्वयंसेवक मधुसूदन चैटर्जी, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य, शीतल चौधरी, विष्णुदेव यादव, विकास यादव, अमोल भलमे, कार्तिकी कावळे, अमित पालिया, यश केडिया, रोशनी बाघेर, निशित जयपुरिया आदीनी मॉल मधील व्यापाऱ्याना 'अर्थ अवर'बाबत माहिती दिली. ऊर्जा बचत, प्लास्टिक बहिष्कार, पाणी बचत, अन्नाची नासाडी, कागदाचा कमीत कमी उपयोग याविषयी जनजागृती केली. अर्थ अवर ची प्रेरणा घेऊन नागपुरात 'पौर्णिमा दिवस' साजरा करण्यात येतो. या दिवशीही रात्री एक तास विजेची उपकरण बंद ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले. 'अर्थ अवर' दरम्यान इटर्निटी मॉल मधील अनावश्यक वीज उपकरणें एक तास बंद ठेवण्यात आले.

### काय आहे 'अर्थ अवर'

'अर्थ अवर' एक विश्वव्यापी अभियान आहे. उर्जाबचत हा मुख्य उद्देश समोर ठेवून सर्वप्रथम सन २००७ मध्ये ऑस्ट्रेलिया मधील सिडनी या शहरात साजरा करण्यात आला. आज जगातील १८७ देशांतील सात हजार शहरांमध्ये साजरा करण्यात येतो. याच उपक्रमाची प्रेरणा घेऊन तत्कालीन महापौर प्रा. अनिल सोले यांनी नागपुरात मनपाच्या माध्यमातून जानेवारी २०१४ पासून 'पौर्णिमा दिवस' संकल्पना मांडली. नागपूर शहरात प्रत्येक पौर्णिमेला मनपा आणि ग्रीन विजीलद्वारे शहरातील अनावश्यक वीज उपकरणे रात्री एक तास बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात येते.

## मनपाच्या सहा हजार विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीनचे मोफत वाटप




नागपूर: नागपूर महानगरपालिका आणि रोटरी क्लब ईशान्य यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील सहा हजार विद्यार्थीनींना त्यांच्या सॅनिटरी नॅपकीनचा वर्षभराचा साठा मोफत वाटपाचा कार्यक्रम शनिवारी (ता.२४) ला आसीनगर झोनमधील एम के आझाद शाळेत झाला. शाळेच्या मुख्याधापिका निखत रेहाना यांच्या हस्ते विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकीनचे वाटप करण्यात आले.यावेळी शाळेच्या मुख्याधापिका निखत रेहाना यांनी सॅनिटरी नॅपकीनचे महत्व काय आहे. हे पटवून दिले. मनपाच्या शाळेतील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील ५८०० विद्यार्थीनींना प्रत्येकी ९६ सॅनिटरी नॅपकीनचे वाटप करण्यात आले आहे. या अभिनव उपक्रमाची सुरुवात १९ मार्च पासून सुरु झाली. मनपाच्या दहाही झोनमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. महानगरपालिकेच्या ८४ शाळेंचा सहभाग यात होता. या उपक्रमाची पूर्वपिठिका रोटरी क्लब ईशान्यच्या निलू टावरी यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितली. मासिक पाळी हा नैसर्गिक क्रिया आहे. त्याबद्दल कोणतीही मनात भीती आणि लाज बाळगू नये.



## धनुर्विद्येत प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंतांचा मनपाद्वारे सत्कार

नागपूर: धनुर्विद्येत राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य मिळवलेल्या तीन खेळाडूंचा नागपूर महानगरपालिकेद्वारे सत्कार ३ मार्च रोजी मनपा मुख्यालयात करण्यात आला. यावेळी स्थायी समिती सभापती विरेंद्र कुकरेजा, आमदार अनिल सोले, आमदार मिलिंद माने, क्रिडा समिती सभापती नागेश सहारे, उपसभापती प्रमोद तभाने, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये संदीप नारायणराव गवई, रुपम केवटे, मोहम्मद जिशान यांचा समावेश आहे. यांना छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार प्राप्त आहे. हे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्तरीय स्पर्धेत पदके प्राप्त केली आहे.
यावेळी बोलताना सभपती नागेश सहारे म्हणाले, धनुर्विद्या या खेळाच्या मैदानासाठी मनपा पुढाकार घेत आहे. अत्यंत कठीण परिश्रमातून हे खेळाडू वर आले असून यांना सरावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यासाठी मनपा नक्कीच प्रयत्नशील आहे., असेही ते म्हणाले.



नागपूर : सुयोगनगर उद्यान येथे महापौर निधीतून बांधण्यात येणाऱ्या 'ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रा'चे भूमिपूजन महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी सत्तापक्ष नेते संदीप जोशी, नगरसेवक अविनाश ठाकरे, संदीप गवई, नगरसेविका विशाखा मोहोड, जयश्री वाडीभस्मे यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# पाचपावली सुतिकागृहाचा होणार कायापालट

## विरेंद्र कुकरेजा : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रस्ताव



नागपूर: राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे संचालित उत्तर नागपुरातील पाचपावली सुतिकागृह 'मॉडेल' करण्याचा प्रस्ताव आहे. नागपूर महानगरपालिकेला तसा प्रस्ताव प्राप्त झाला असून पुढील तीन महिन्यात या सुतिकागृहाचा संपूर्ण कायापालट होणार आहे. सध्या १० खाटांची क्षमता असलेल्या पाचपावली सुतिकागृहात पुन्हा ३० खाटांची भर पडणार आहे. स्थायी समितीचे सभापती विरेंद्र कुकरेजा यांनी एका विशेष बैठकीत ही माहिती दिली. सदर बैठकीचे आयोजन शुक्रवारी (ता. २३) मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात करण्यात आले होते. बैठकीला आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. संजय जयस्वाल, स्थायी समितीचे सदस्य नगरसेवक मनोज सांगोळे, अतिरिक्त उपायुक्त राजेश मोहिते, आरोग्य अधिकारी (दवाखाने) डॉ. अनिल चिव्हाणे, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे विभागीय कार्यकारी अभियंता राजेंद्र लोंढे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय जोशी, पाचपावली सुतिकागृहाच्या प्रमुख डॉ. सीमा पारवेकर, भाजपचे उत्तर नागपूरचे अध्यक्ष दिलीप गौर, महामंत्री रवींद्र डोंगरे, सुनील मित्रा, संजय तरारे, डॉ. एम. सी. थोरात, कार्यकारी अभियंता गिरीश वासनिक, डॉ. संगीता बलकोटे उपस्थित होते. आरोग्य सेवा उपसंचालकांनी सदर प्रस्ताव महानगरपालिकेपुढे ठेवला आहे. सुतिकागृहाचे प्लोरिंग बदलवणे, स्वच्छता व्यवस्था व्यवस्थित करणे, रंगरंगोटी करणे, इमारतीला काही लिकेजेस आहेत, ते दुरुस्त करणे, इमारतीच्या उपयोगात नसलेल्या जागेत आवश्यक ते बांधकाम करून खाटांची संख्या वाढ या बदलाचा प्रस्तावात अंतर्भाव आहे. मोकळ्या जागेतील शिकस्त इमारती निर्लेखित करून तेथे म्पी थिएटर आणि हिरवळ तयार करण्याचेही प्रस्तावित आहे. स्थापत्य विषयाचे काम पूर्ण झाल्यानंतर अत्याधुनिक मशिनरीचा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्याला २२ लाख रुपये खर्च अपेक्षित असल्याची माहिती आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. संजय जयस्वाल यांनी सांगितले. दरम्यान, या सुतिकागृहाचे नूतनीकरण एनयूएचएमअंतर्गत प्रस्तावित असून त्याचा कार्यादेश झाला असल्याची माहिती आरोग्य अधिकारी डॉ. अनिल चिव्हाणे यांनी दिली. जर कार्यादेश झाले असतील तर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार ते बांधकाम करण्यात यावे. सुरक्षा सोयी उपलब्ध करून देण्यात याव्या. तीन महिन्यानंतर या कामाचा आढावा घेण्यात येईल. नूतनीकरणानंतर तेथे काय-काय मशिनरी उपलब्ध करून द्यायच्या आहेत, याचाही प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश सभापती विरेंद्र कुकरेजा यांनी दिले.